भूमिसंपादन.....अधिनियम, २०१३ वा अन्य अधिनियमानुसार संपादक संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावाबाबत प्राथमिक अधिसूचनेनंतर करावयाच्या संयुक्त मोजणी व त्यानुसार अचूक नोंदी घेण्याची कार्यपद्धती या कार्यवाही अनुषंगाने मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.३०/अ-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दि.३१.०१.२०२३

**प्रस्तावना :-**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ तसेच राज्यामध्ये सदर अधिनियमाच्या अनुसूची ४ व अनुसूची ५ मध्ये नमूद अधिनियमांनुसार भूसंपादन आणि सार्वजनिक प्रयोजनाकरीता थेट खरेदी धोरणानुसार जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाही केली जाते संपादन होणाऱ्या जमिनीबाबत क्षेत्र, वहिवाट व जमिनीवरील फळझाडे, बांधकामे यांची अचूक नोंद होऊन योग्य तो मोबदला भूधारकास/हितसंबंधितास मिळावा व जास्तीचा मोबदला गैरप्रकारे मिळविण्याच्या हेतूने प्राथमिक अधिसूचनेनंतर जमिनीवर केलेले बदल/घटक यांना अटकाव करण्यासाठी ड्रोन रोव्हर व उपग्रह छायाचित्रांसह KML फाईल्सचा वापर करणे आवश्यक बनले आहे.

त्यासंदर्भात संपादक संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावाबाबत प्राथमिक अधिसूचनेनंतर करावयाची संयुक्त मोजणी व त्यानुसार अचूक नोंदी घेण्याची कार्यपद्धती बाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार सर्वंकष विचारविनिमय करुन शासन खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देत आहे.

**शासन परिपत्रक :-**

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ तसेच अन्य अधिनियमांनुसार सार्वजनिक प्रयोजनाकरिता भूसंपादन आणि थेट खरेदी धोरणानुसार जमीन ताब्यात घेण्याची कार्यवाहीबाबत संपादक संस्थेकडून प्राप्त भूसंपादन प्रस्तावाबाबत प्राथमिक अधिसूचनेनंतर करावयाची संयुक्त मोजणी व त्यानुसार अचूक नोंदी घेताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

१. कोणत्याही अधिनियमांतर्गत भूसंपादनाचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना सादर करताना प्रस्तावासोबत संपादन संस्थेने प्रस्ताव दिनांकापासूनचे अद्ययावत ७/१२ उतारे व ड्रोन द्वारे केलेले छायाचित्रण सादर करावे.

२. प्राथमिक अधिसुचने नंतर करण्यात येणाऱ्या संयुक्त मोजणीचे छायाचित्रण करण्यात यावे व त्यावेळी स्थानिक प्रकल्पबाधित भूधारक तसेच संयुक्त मोजणीशी संबंधित सर्व प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

३. संयुक्त मोजणी वेळी ड्रोन द्वारे जमिनीची घेतलेली छायाचित्रे (Photographs) व D.G.P.S (रोव्हर व बेस) (Differential Global Positioning System) यंत्राद्वारे भूमापन अधिकारी / सर्वेअर यांनी घेतलेली अक्षांश रेखांक्ष यांचा वापर करुन सद्यस्थितीत इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या Software द्वारे सहाय्याने KML Files तयार करणे शक्य आहे, त्याचा वापर करावा. राज्यात ७७ ठिकाणी CORS- Station स्थापित करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्हयामध्ये यापुढे ROVER उपलब्ध होणार आहेत. त्या ठिकाणी भूसंपादन मोजणी ROVER च्याच सहाय्याने करण्यात याव्यात तसेच अंतिम निवाडा (Award) मंजूर करतांना सदर गट/भूमापन क्रमांकापुढे Co-ordinates निवाडयामध्ये समाविष्ट करणे आवश्यक राहिल. तसेच या प्रकरणी झालेले अंतिम निवाडा (Award) व मोजणी नकाशा व Co-ordinates हा Scan करुन Cloud वर ज्या दिवशी Award घोषीत होत आहे त्याच दिवशी Upload करावा.

४. तांत्रिक बाबींसाठी Nodal Agency म्हणून भूमि अभिलेख विभाग यासाठी सक्षम असल्याने नेमणूक करण्यात यावी अन्य अशा संस्थेच्या नेमणुकीची आवश्यकता नाही.

५. संयुक्त मोजणीस लागणारी Laptop / Rover & Controller/Plotter यासारखी आधुनिक यंत्रसामुग्री संबंधित भूसंपादन अधिकाऱ्याच्या स्वीय प्रपंजी खात्यात जमा सोई-सुविधा शुल्कातून भूमि अभिलेख कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून त्याचा संकेतांक क्र २०२३०२०११८०२४६६८१९ असा आहे. सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

KEDARPRATAP JAYSING PATIL

Digitally signed by KEDARPRATAP JAYSING PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a304b555c16c6333932e94031b478a58b30bb35922ff7cfdc101bf31d56ff8d, pseudonym=B44BF88097D80ECCD982D43904A6888B06CD57C, serialNumber=3847160374ED91C72AF7F541ED5885A54E39968A0CDDD47C85355D5B730A408F, cn=KEDARPRATAP JAYSING PATIL
Date: 2023.02.01 18:08:03 +05'30'

(केदारप्रताप पाटील)
कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अ.मु.स., मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वित्त व वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. अ.मु.स. (मदत व पुनर्वसन) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव (नियोजन) यांचे स्वीय सहायक, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.व्यवस्थापकीय संचालक सिडको, सिडकोभवन, सि.बी.डी. बेलापूर, नवी मंबई
१६.मा.महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई
१७.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, मुंबई
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
१९.सर्व विभागीय आयुक्त
२०.सर्व जिल्हाधिकारी
२१.प्रादेशिक अधिकारी, मुंबई, महाराष्ट्र,भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, नवी मुंबई.
२२. प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नागपूर प्रादेशिक कार्यालय, नागपूर-४४००३३
२३.महाव्यवस्थापक (भूमि व सर्वेक्षण), महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्या.,मुंबई
२४. संचालक, नगर रचना, पुणे
२५.सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा)
२६.निवडनस्ती (अ-२).